राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान (NUHM) अंतर्गत जनजागृती उपक्रम कृती नियोजन - सन २०१८-१९ साठी प्रशासकीय मंजूरी देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय, क्रमांकः आयईसी २०१९/प्र.क्र. ५१/आरोग्य ३
१० वा मजला, संकुल इमारत,
जी.टी. रुग्णालय आवार, मुंबई - ४०० ००१.
दिनांक : २८ मार्च, २०१९.

वाचा :

१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक - मावज २०१६/प्र.क्र.३९७/३४, दि.०५.०१.२०१७

२) उपसंचालक,राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग,पुणे यांचे पत्र क्रमांक- उसंआसे /राआशिवसंवि/प्रकक्ष/NUHM/३५७-५८/२०१९,दिनांक १६.०२.२०१९व दि.१२.०३.२०१९.

३) माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे क्रमांक- वृत्तचित्र-१९/सार्व.आ.मा.आराखडा/ का-७/१५५७, दि.१५.०२.२०१९.

शासन निर्णय:

राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान (NUHM) अंतर्गत जनजागृती उपक्रम कृती नियोजन -सन २०१८-१९ अंतर्गत खालील जनजागृती व प्रसिध्दी उपक्रमास माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने उपरोक्त पत्रान्वये मान्यता दिली असून सदर कार्यक्रमास पुढीलप्रमाणे प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे :-

	Media	**Details**	**Rate**	**Frequency**		**Total**
				Details of frequency	**frequency**	
A) सार्वजनिक आरोग्य विभाग, पुणे यांच्या मार्फत प्रसिध्दी करण्यात येईल						
1	folder colour A4 Size 210 GSM Designing / type Setting / Printing	To all 95 centres 3000 each	10	No of copies	285000	28,50,000
2	Posters	To all 95 centres.	10	No of copies	1,20,000	12,00,000
		Total A				40,50,000
B) माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत प्रसिध्दी करण्यात येईल						
3	51 Private FM Radio channels	One Minute jingle three times in a day on all Private FM Channels.	1,60,000	No. of days	6	9,60,000
4	All India Radio	60 sec jingle in mid break of news bulletin of 7.10 am and 7.00 pm news bulletins	1,70,000	No. of days	4	6,80,000
		Total B				16,40,000
5	Creative	Audio Jingle	50,000	No. of creations	1	50,000
6	Impact assessment, Survey & Feedback collection					2,00,000
		GRAND TOTAL				59,40,000

२. वर नमूद विविध उपक्रमांसाठी आवश्यक रु.५९.४० लाख इतका खर्च सन २०१८-१९ या वर्षाकरीता मंजूरी असलेल्या राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान (NUHM) अंतर्गत (U 11 IEC-BCC) जनजागृती कार्यक्रम अंतर्गत मंजुर निधी रक्कम रु. १०६.४६ लाख या निधीमधून भागविण्यात यावा.

३. सदर उपक्रमास महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई यांची मान्यता घेण्यात यावी.

४. सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत विविध आरोग्य विषयक उपक्रमांविषयीची जनजागृतीबाबतची देयके अदा करण्यापुर्वी दुरचित्रवाणी, रेडीओ, वृत्तपत्रे, जाहिरात फलक, एसटी बस पॅनल तसेच एसटी बसमधील सीटबॅक, एसटी स्टँडवरील होर्डींग, प्रवासी रिक्षा पॅनल, रेल्वे डिस्प्ले, एसएमएसव्दारे संदेश, सिनेमागृहात प्रसिध्दी, पीव्हीसी बॅनर्स इ.विविध प्रसिध्दी साधनांव्दारे संबंधीत सर्व उपक्रमांची प्रत्येक ठिकाणी पुर्ण् करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत खात्री करुन घेण्यासाठी आयुक्त, आरोग्य सेवा तथा संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांनी व्यवस्था तयार करावी. तद्नंतरच देयक अदा करणेबाबत पुढील कार्यवाही करावी.

५. सदर शासन निर्णय, शासन निर्णय,वित्त विभाग क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/ विनियम भाग-२,दि.१७.४.२०१५ सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका,१९७८,भाग पहिला,उपविभाग-दोन मधील अ.क्र.४,नियम क्र.७ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमीत करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३२८१५१९२८७९१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Roshani Dinesh Kadam Patil

Digitally signed by Roshani Dinesh Kadam Patil
DN: CN = Roshani Dinesh Kadam Patil, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Health Department
Date: 2019.03.28 17:30:30 +05'30'

(रो.दि.कदम-पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. महालेखापाल- १ / २, महाराष्ट्र, (लेखा परिक्षा) (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर.

२. आयुक्त, आरोग्य सेवा तथा संचालक, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान, मुंबई.
३. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई.
४. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
५. सहसंचालक, (अर्थ व प्रशासन)आरोग्य सेवा, मुंबई.
६. उप संचालक, आरोग्य सेवा, राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, पुणे.
७. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
८. वित्त विभाग (कोषागारे/ प्रशासन ५), मंत्रालय, मुंबई.
९. कक्ष अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग (अर्थसंकल्प), मंत्रालय, मुंबई.
१०.निवडनस्ती (कार्यासन आरोग्य-३).